लातूर समाचार
LATUR SAMACHAR

# श्री बंकटलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये सायबर सेक्युरिटी कार्यशाळा उत्साहात संपन्न



**लातूर/प्रतिनिधी** : सायबर जागरूकतेचा प्रसार करण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर एज्युकेशन फॉर सायबर सेक्युरिटी हा उपक्रम लातूर जिल्ह्यात गेली तीन वर्षे सातत्याने राबवला जात आहे. याच उपक्रमांतर्गत शनिवार, दिनांक २ ऑगस्ट २०२५ रोजी श्री बंकटलाल लाहोटी इंग्लिश स्कूल, लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सेक्युरिटी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेत राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान विभागातील 'सायबर वॉरियर्स' – ओमकार राजेंद्र सूर्यवंशी, अर्जुन गंगाधर चव्हाण, यज्ञेश अभिजित शिंदे आणि ऋषभ धोंडगे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सोशल मिडिया आणि इंटरनेटचा अयोग्य व अतिवापर कसा घातक ठरतो याची उदाहरणांसह सखोल माहिती दिली. तसेच, डिजिटल फसवणुकींपासून संरक्षण कसे करावे, सायबर गुन्हे कसे ओळखावेत आणि त्यांची नोंद कशी करावी, यासह सायबर सेल, गुन्हा नोंदणी प्रक्रिया आणि हेल्पलाईन क्रमांकांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

कार्यशाळेच्या शेवटी विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा अभिप्राय घेण्यात आला, त्यातून या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. या कार्यशाळेस शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. रिचा तिवारी, क्विक हिल फाऊंडेशनचे एरिया कोऑर्डिनेटर विक्रांत मापुस्कर, तसेच शिक्षकवृंद श्री. विकास येवते, श्रीमती दिपाली डुमणे, श्रीमती प्रनिता देशपांडे आणि सहकारी मनिष अंबुरे उपस्थित होते. कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता वाढण्यास मोठी मदत झाली असून, या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.